सातारा
सकाळ
सातारा, मंगळवार, २६ जुलै २०१६
२

# कोरेगावात हुल्लडबाजांवर करडी नजर

## पोलिस यंत्रणा सक्रिय; दोघांवर प्रतिबंधात्मक कारवाई, ४० दुचाकीस्वारांकडून दंड वसुली

**पळशी, ता. २५ :** कोरेगाव येथील डी. पी. भोसले महाविद्यालयातील काही युवतींच्या नुकत्याच झालेल्या छेडछाडीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी कारवाई सुरूच ठेवली आहे. दारूच्या नशेत भरधाव वेगातील दुचाकीने महाविद्यालय परिसरात जाऊन धूम्रपान करत प्राध्यापक व वॉचमनला शिवीगाळ केल्याप्रकरणी कोरेगावातील चौथाई गल्ली येथील दोघांवर पोलिसांनी आज प्रतिबंधात्मक कारवाई केली. याशिवाय मोटार व्हेईकल ॲक्टखाली चाळीस जणांवर कारवाई करून साडेचार हजारांचा दंड वसूल करण्यात आला.



**कोरेगाव : डी. पी. भोसले महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारावर सोमवारी हुल्लडबाजांवर पाळत ठेवणारे पोलिस.**

पोलिसांच्या माहितीनुसार, विशाल चंद्रकांत बर्गे (वय २२) व जहीर शकील मुल्ला (वय २१, दोघेही रा. चौथाई गल्ली, कोरेगाव) यांच्यावर आज प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली.

दरम्यान, पोलिसांनी आज महाविद्यालयाच्या परिसरात, तसेच प्रवेशद्वारावर हुल्लडबाजांवर करडी नजर ठेवली होती. विनापरवाना, तसेच कागदपत्रे न बाळगता दुचाकी चालवणाऱ्या, ट्रिपल सीट, तसेच जोरात हॉर्न वाजवत भरधाव वेगात दुचाकी चालवत हुल्लडबाजी करणाऱ्यांना पोलिसांनी आज 'लक्ष्य' केले होते. त्यानुसार, १६ जणांवर बीपी ॲक्टखाली कारवाई करून संबंधितांना ताकीद देण्यात आली. त्याचबरोबर मोटार व्हेईकल ॲक्टखाली २५ जणांवर कारवाई करून संबंधितांकडून साडेचार हजारांचा दंड वसूल करण्यात आला. या कारवाईमुळे या परिसरात हुल्लडबाजी करणाऱ्यांची आज दिवसभर चांगलीच पळापळ झाली. दरम्यान, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसच्या कोरेगाव शहर शाखेतर्फे जिल्हा उपाध्यक्ष अमर शिंदे, शहर अध्यक्ष सोमनाथ बर्गे, उपाध्यक्ष शुभम भिसे यांनी आज पोलिस ठाण्यात निवेदन देऊन वाढती गुंडगिरी व रोड रोमियोंवर कारवाई करण्याची मागणी केली.

डी. पी. भोसले कॉलेज
ग्रंथालय
कोरेगाव